गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

दैनिक झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

वर्ष :३ रे | अंक ६९ | मंगळवार दि.०३/१२/२०२४ | पाने ४ | किमत ४ रु | POSTAL Reg.No.CSN/RNP/537/2024-2026

*** सुविचार ***

दुसऱ्यासाठी डोळ्यात पाणी आल की समजावं आपली माणुसकी अजूनही जिवंत आहे

पाचोर्यात एड्स जनजागृती अभियान रॅलीचे आयोजन

पाचोरा तालुका प्रतिनिधी ज्ञानेश्वर सोनवणे

दिनांक २ डिसेंबर २०२४ सोमवार रोजी जागतिक एडस दिनानिमित्त आय.सी. टी. सी. विभाग ग्रामीण रुग्णालय पाचोरा व साईनाथ सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आणि डॉक्टर वाय पी युवा फाउंडेशन एन.जी.ओ खडकदेवळा बु. व. गो.से हायस्कूल पाचोरा यांच्या संयुक्त विद्यमाने पाचोरा ग्रामीण रुग्णालयापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक भाजी मंडी व इतर भागात एचआयव्ही एडस जनजागृती अभियान रॅली काढण्यात आली गो.से हायस्कूल पाचोरा विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येत उपस्थित होते एच आय व्ही एडस जनजागृती पर जागतिक एडस दिनाचे विशेष महत्व एचआयव्ही म्हणजे काय यातील फरक एचआयव्ही होण्याची प्रमुख कारणे कोणती? विशेष घ्यायची काळजी समाजातील गैरसमज उच्चार व एचआयव्ही संबंधित व्यक्तींना योग्य संबंधीची वागणूक मिळवावी त्यासाठी प्रयत्न करणे या सर्व मुद्द्यांवर ग्रामीण रुग्णालय पाचोरा येथील समुपदेशक श्रीमती लता चव्हाण व प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री श्रीकांत भोई यांनी माहिती मार्गदर्शन केले तसेच सर्व उपस्थित त्यांनी शपथ घेतली.

राजकीय भूकंपाचे संकेत !

एकनाथ शिंदे विरोधी पक्षनेते? कोणी केलं हे गुपित उघड?

मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन कैक दिवस उलटले. महायुतीला मताधिक्य मिळालं, असं असलं तरीही राज्यातील सत्तास्थापनेचा तिढा मात्र अद्यापही सुटलेला नाही. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी कोण विराजमान होणार, गृहखातं आणि इतर पालकमंत्रीपदं कोणाकडे जाणार. मंत्रिमंडळ वाटपामध्ये कोणत्या पक्षाला झुकतं माप दिलं जाणार याविषयीचे फक्त तर्कवितर्क सध्या लावले जात आहेत. नेतेमंडळींची वक्तव्य, चर्चा आणि बैठका यांच्यापलिकडे अद्यापही कोणतीच अधिकृत घोषणाही करण्यात आली नसल्यामुळं राज्यातील सत्तास्थापनेसंदर्भात बराच संभ्रम पाहायला मिळत आहे. एकिकडे राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काही दिवसांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळं मुख्य प्रकाशझोतापासून दूर राहिले असले तरीही मंत्रिमंडळात त्यांच्या मागण्या नेमक्या काय आहेत, याची बरीच चर्चा झाल्याचं पाहायला मिळालं. गृहमंत्रीपद आणि १३ मंत्रिपदाच्या मागणीवर शिंदेंचा शिवसेना पक्ष ठाम असल्याचं बोललं गेलं. सुरुवातील मुख्यमंत्रीपद आणि उपमुख्यमंत्रीपदासाठीसुद्धा त्यांच्या नावाच्या चर्चांना वाव मिळाला. त्यातच आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या एका पोस्टनं सत्तास्थापनेता गुंता आणखी वाढवला आहे असं म्हणणं गैर ठरणार नाही. एकनाथ शिंदे यांच्या वाट्याला विरोधी पक्षनेतेपद जाणार असल्याची एक प्रश्नार्थक पोस्ट त्यांनी केली आणि हा तिढा आणखी वाढल्याचं स्पष्ट झालं. दमानिया यांनी द पोस्टमध्ये लिहिलेल्या ओळी पाहता येत्या

काही दिवसात महायुतीत नेमक्या कोणत्या राजकीय घाडमोडी घडणार आणि खरंच राज्यात राजकीय भूकंप येणार का? हाच प्रश्न उपस्थित होत आहे. 'एकनाथ शिंदे विरोधी पक्ष नेते? परवाच संध्याकाळी, आमच्या काही कार्यकर्त्यांना मी एक पत्रकार भाऊंशी झालेला संवाद संगात होते. ४ दिवसांपूर्वी झउ घेऊन भाजप ला समर्थन देणारे शिंदे अचानक गावी गेले, मग ताप काय आला, मग घरी काय आले, दाल मे कूछ काला है.' माध्यम प्रतिनिधींचा हवाला देत ही भाजपचीच रणनीती असून, यामध्ये विरोधी पक्षच संपवण्याचा भजपचा कट असल्याचा गंभीर आरोप दमानिया यांनी केला.

सुरेश बनकर यांचे सावळदबारा परिसरात आभार दौरे

जनता जनार्दनांनी मला भरभरून आशीर्वाद दिले, नव्याने मतदारांचा विश्वास जिंकु, पूर्ण ताकतीने कामाला लागू कार्यकर्त्यांची बनकर यांना भावनिक साद

सोयगाव तालुका.. प्रतिनिधी दिलीप मोरे...

सिल्लोड – सोयगाव मतदारसंघातील जनता जनार्दनांनी दिलेला

कौल नम्रपणाने स्वीकारला आहे. मात्र, आम्ही पराभवाने खचणारे नाहीत, आता पुन्हा जोमाने कामाला लागू, अजून मेहनत घेऊन, संघर्ष करून कर्तृत्व सिद्ध करू अशी भावनिक साद उद्धवसेनेचे सुरेश पा.बनकर यांनी कार्यकर्त्यांना घातली. निवडणूक निकालानंतर अवघ्या पाच दिवसांत भेटण्यासाठी सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात बनकर यांनी आभार दौरे घेऊन जनता जनार्दनांचे आशीर्वाद घेत आभार मानले दौऱ्यात कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले. बनकर यांनीही कार्यकर्त्यांसोबत दिलखुलास चर्चा केल्या

सिल्लोड सोयगाव मतदारसंघात महायुती व महाविकासआघाडीमध्ये थेट लढत झाली. त्यामध्ये महायुतीचे उमेदवार अब्दुल सत्तार यांचा विजय झाला तर सुरेश पा. बनकर यांना थोड्या मताने पराभव स्वीकारावा लागला. निवडणूक निकालानंतर पाच ते सहा दिवसांत सावळदबारा येथील प्रभू श्री चक्रधर स्वामी मंदिराच्या प्राणांगणात बनकरांनी आभार बैठक घेतली त्यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बनकर म्हणाले की, गेली अनेक वर्षे या मतदारसंघातील विकास झालेला नाही त्यामुळे आम्ही हार मानलेली नाही विकासाला

चालना देण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीनिशी उभे राहू व मतदारांना विश्वासात घेऊ मूलभूत गरजांसाठी लोकांचा संघर्ष बघितला. संघर्षातून उभ्या राहिलेल्या विचारांनी, मतदारसंघाच्या विकासासाठी आणि

निकालाचा कौल हा शेवट नाही

निवडणूक निकालाचा कॉल हा प्रवासाचा शेवट नाही, असे सांगून सुरेश पा. बनकर म्हणाले ही लढाई कधीच राजकीय सत्ता मिळवण्यासाठी नव्हती. समाजातील प्रत्येक घटकासाठी, मतदारसंघाच्या विकासासाठी, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सर्वांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य आणायचं होते, असे सुरेश पा.बनकर यांनी आभार दौर्यात म्हटले

बदलासाठी आपण एक नवा अध्याय लिहावा, या हेतूने विधानसभा निवडणुकीत उतरलो होतो. जनतेचा कौल खूप काही शिकवून गेला. अजून खूप काम करायचं आहे, मेहनत घ्यायची आहे, संघर्ष करून कर्तृत्व सिद्ध करायचं आहे, असे ते म्हणाले. जनतेचा विश्वास मिळवण्यासाठी अजून झटायचं आहे, मतदारसंघाच्या विकासासाठी पूर्ण क्षमतेने यापुढेही मेहनत करीत जोमाने कामाला लागु, माझ्याबद्दल जनतेच्या मनात असलेली आपुलकी आणि डोळ्यात आलेले अश्रू मला खूप काही सांगून जातात जनतेचा माझ्याबद्दल इतका प्रतिसाद पाहून मला माझा विजय झाल्यासारखे वाटत आहे असा शब्दही त्यांनी कार्यकर्ते, समर्थकांना दिला त्यावेळी गावातील एकवटलेल्या कार्यकर्त्यांनी बनकर यांना आमच्या मनातील आमदार तुम्हीच आहे आणि तुम्हीच राहणार असे सांगितले

मोफत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन

अन्यायग्रस्त नागरिकांची होणार सोय

दैनिक झुंजार जनता. देगलूर तालुका प्रतिनिधी सायलु कृष्णापुरे

देगलूर : येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे ॲड. अंकुशराजे जाधव अंबुलगेकर,ॲड. सद्दाम शेख दावणगीरकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या मोफत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन रविवारी दि. १ रोजी करण्यात आले. देगलूर शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांची या सल्ला केंद्रामुळे सोय होणार आहे. माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी पंचायत समिती सभापती शिवाजीराव देशमुख बळेगावकर, ज्येष्ठ विधिज्ञ अशोक जाधव लच्छनकर, आर. ई. डोंगळीकर, सामाजिक कार्यकर्ते सुभाष अल्लापुरकर, अंबुलगा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिनिधी खुशाल पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत या मोफत कायदेशीर सल्ला केंद्राचे उदघाटन करण्यात आले. यावेळी श्री. गोजेगावकर यांनी या अभिनव संकल्पनेचे कौतुक करीत सामान्य नागरिकांना न्याय देण्याचा दृष्टीने हा उपक्रम

अतिशय उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले. शहर व तालुक्यातील गोरगरीब जनतेला न्याय मिळवून आपण कटिबद्ध असल्याचे मत ॲड. अंकुशराजे जाधव यांनी यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, पत्रकारिता क्षेत्रातील लोकांसह वकील मंडळींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

युवा कार्य प्रशिक्षणार्थींना सेवेत कायम करा..

उमरी प्रतिनिधी:- मनोज पाटील गोळेगावकर

राज्य शासनाने महाराष्ट्रातील सुशिक्षित पदवीधर बेरोजगार विविध क्षेत्रातील तरुणांना सहा महिन्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी म्हणून आरोग्य शिक्षण विभागासह इतरही विभागात संधी दिली आहे मात्र अत्यावश्यक सेवेच्या ठिकाणी गरजेची बाब म्हणून या प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी नेमणूक द्यावी अशी मागणी होत आहे.

राज्य शासनाने लाडकी बहिण योजना एसटी प्रवास सवलती शेतकरी आत्मसन्मान व इतरही लाभाच्या योजना सुरू केले आहे त्यासाठी कोणत्याही कालावधी निश्चित केलं नाही दरम्यान या योजनेच्या जनजागृतीसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना सुरू केली त्यात राज्यातील बेरोजगार तरुणांना फक्त सहा महिन्यासाठी शासनाच्या विविध विभागात संधी दिली पण सहा महिन्याची अठ काढून टाकावी अशी मागणी राज्यातील युवा वर्गातून होत आहे स्वतः प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्या पालकांमधून हा सूर उमटत असल्याचे पाहायला मिळत आहे..

लासूरला इच्छापुर्ती महाकाल मंदिरात भस्माआरती संपन्न

हजारो महिला पुरुष शिवभक्तांची उपस्थिती

गंगापुर प्रतिनिधि हरून पठान

गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन जवळील गवळीशिवरा रोडवरील सुलतानाबाद येथे ज्योतिषतज्ज्ञ डॉ. शितल अग्निहोत्री यांच्या इच्छापूर्ती महाकाल महादेव मंदिर येथे सोमवारी दुपारी बारा वाजता इच्छापूर्ती महाकाल शिवलिंगावर उज्जैन येथील चक्रवर्ती स्मशानभूमी येथील बम बम नाथजी महाराज यांच्या शुभहस्ते भस्माआरती करण्यात आली.

यावेळी छत्रपती संभाजी गर शहरासह पुणे,जालना,नाशिक,अहिल्यानगर आधी जिल्ह्यातून शिवभक्तांची उपस्थिती भस्माआरतीला होती ढोल ताशाच्या गजरात इच्छापूर्ती महाशिवलिंगाला भस्म आरती करण्यात आली हजारो भाविकांची मंदिरात उपस्थिती होती डॉ. शितल अग्निहोत्री त्यांनी या वेळेस महाकाल दरबार भरवून लोकांच्या अनेक समस्या जाणून घेतल्या व त्यांना त्यावर उपाय सांगितले.

बम बम नाथजी महाराज (आश्रम,चक्रवर्ती स्मशान घाट उज्जैन म. प्रदेश) लासुर स्टेशन येथील ज्योतिषतज्ञ डॉ.शीतल अग्निहोत्री यांच्या विनंतीवरून आम्ही थेट उज्जैन इथून सुलतानाबाद येथील इच्छापूर्ती महाकाल मंदिरातील शिवलिंगावर भस्माआरती केली आहे यामुळे शिवभक्तांच्या मनोकामना पूर्ण होतील व ह्या इच्छापूर्ती महाकाल मंदिरातील शिवलिंगाजवळ बसून शिवभक्त आपले दुःख दूर करू शकतात एवढी ताकद भस्माआरतीमध्ये आहे त्यामुळे भस्मारतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

जनता विद्या मंदिर प्रशालेमध्ये सेवापूर्ती समारंभ उत्साहात साजरा

दत्ता गोरे लातूर जिल्हा प्रतिनिधी

लातूर दि.०२ मुरुड येथील जनता विद्या मंदिर प्रशालेमध्ये सेवानिवृत्त झालेल्या उच्च माध्यमिक विभागातील प्रा.प्रभाकर मुंडे प्रयोगशाळा सहाय्यक श्री अशोक साबळे वरिष्ठ लिपिक श्री वैजनाथ साबळे या तीन कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सोहळा अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री नामदेव मेशाम यांची तर प्रमुख अतिथी म्हणून मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार श्री विक्रम काळे यांची प्रमुख उपस्थिती होती मंचावर रुरल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री हरिश्चंद्र माने सचिव ऍड श्री विजय पाटील कोषाध्यक्ष श्री बी एस पटाडे सहसचिव श्री विवेक पांगळ सौ सुवर्णा पांगळ,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री अमर मोरे श्री अंकुश नाडे उपमुख्याध्यापक श्री डी व्ही जाधव पर्यवेक्षक श्री अरुण पाटील श्री जी पी पिसाळ श्रीमती तनुजा कोष्टी उपप्राचार्य प्रा दीपक सागावे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या व प्रशालेच्या वतीने आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते तीनही सेवापूर्ती झालेल्या कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला तसेच जनता विद्या मंदिर कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने देखील या तीनही कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी बोलताना आमदार विक्रम काळे यांनी रूरल एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून जनता विद्या मंदिर प्रशालेमध्ये अनेक दर्जेदार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असून तीस ते पस्तीस वर्षे सेवा करून प्रत्येक कर्मचारी अतिशय समाधानाने येथून सेवानिवृत्त होऊन जातो व आयुष्यात कृतकृत्य होतो असे प्रतिपादन केले अध्यक्ष समारोपात प्रशालेचे मुख्याध्यापक श्री नामदेव मेशाम यांनी या तीनही कर्मचाऱ्यांनी मागील अनेक वर्ष कशाप्रकारे प्रशालेमध्ये समर्पित भावनेने सेवा केली याची जाणीव सर्वांना करून दिली सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा विस्तारित परिचय श्री रमेश साळुंके व श्री अनिल बनसोडे यांनी करून दिला कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा शहाजी काटे यांनी तर सूत्रसंचालन प्रा बाजुळगे यांनी केले तर आभार प्रा सुधीर मिरकले यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माध्यमिक विभागाचे सांस्कृतिक विभागप्रमुख श्री रामकृष्ण देशपांडे विक्रम कोतवाड प्रा रवी तनमोर प्रा गवळे प्रा महेश खडके प्रा अंचुळे प्रा.सचिन वांगस्कर,प्रा व्ही जे जाधव यांच्यासह माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमास माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी तसेच सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मनरेगा अंतर्गत कुशल कामांसाठी ३ मीटरची अट शिथिलतेसाठी खासदारांना साकडे

जळगांव लोकसभेचे खासदार स्मिताताई वाघ यांच्याकडे मागणी

जळगाव जिल्हा प्रतिनिधी हमीद तडवी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम महाराष्ट्र योजनेतंर्गत कुशल प्रमाणात सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक यासारखी कामे लोकसभा निवडणुकापूर्वी शासनाने मोठ्या प्रमाणावर मंजुर केलेली होती, त्या कामांना तालुका प्रशासनाने प्रस्ताव अंती ग्रामपंचायत स्तरावर सुध्दा मंजुरी दिलेली आहे त्याप्रमाणे गावस्तरावर भौगोलिक परिस्थितीनुसार गल्लीतील लहान मोठे १५ ते २० फूट रुंदीचे रस्ते किंवा गावातील चौक, शाळा किंवा अंगणवाडी परिसर, मंदिर परिसर अशी बरीचशी कामे करण्यात आलेली आहेत ही कामे शासनाच्या इतर योजनेत करता येत नाहीत म्हणुन अशा प्रकारची कामे मनरेगात केली जातात सदरची कामे झालेवर नरेगा आयुक्त नागपुर यांचेकडील दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजीचे पत्र जिल्हास्तरावर आले त्यानंतर तालुक्यांच्या ठिकाणी पत्र यायला वेळ गेला त्यात पुढे विधानसभा निवडणुक आचासंहिता लागु झाली त्यामुळे झालेल्या कामांचे कुशल बिले सादर करण्यास सदरच्या पत्रामुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत म्हणुन गाव पातळीवर केलेल्या मनरेगा कुशल कामांची पेमेंट काढणे दिवसेंदिवस जिकरीचे होत आहे त्याबाबत सध्या प्रशासकीय मार्गदर्शन मिळत नाही म्हणुन जळगांव लोकसभेच्या खासदार स्मिताताई वाघ यांना भेटून जिल्ह्यातील मनरेगा अंतर्गत सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉक कुशल कामांची ३ मीटरची अट शिथिल करण्यासाठी निवेदन देण्यात आले निवेदित करतांना खासदार स्मिताताई यांनी सांगितले की, सदरचा प्रश्न झिरो हॉवर्सला मांडून निकाली काढण्याचे काम केले जाईल, निवेदन देतांना डॉ. दिनकर पाटील माजी कृषी सभापती जि. प. जळगांव तसेच सुरेश पाटोळे, जिल्हाध्यक्ष, ग्रामरोजगार सहाय्यक संघटना महाराष्ट्र राज्य आदि उपस्थित होते

दैनिक
झुंजार जनता

२ मंगळवार दि.०३/१२/२०२४

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा शाळेमध्ये सापाबद्दल जनजागृती आठ फूट अजगराची दिली माहिती

सोयगाव तालुका...
प्रतिनिधी दिलीप मोरे...

जयदेव वाडी येथील सर्पमित्र निलेश उदरभरे यांची शाळा गाव वाडे वस्ती मध्ये जाऊन सापाबद्दलची लोकांना देत आहे माहिती ''साप हा शेतकऱ्यांचा शत्रू नसून मित्र आहे'' पावसाळ्यात सापांची बिळे पाण्याने भरल्याने साप बाहेर येतात. खेड्यापाड्यात मुलांना लहान वयापासून आयुष्यात कधी ना कधी सापांना सामोरे जावे लागते. सापाबाबत शालेय विद्यार्थ्यांमध्ये जगजागृती व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावळदबारा येथे सर्पमित्र निलेश पुजारी यांच्या वतीने सोमवारी दुपारी नुकत्याच जाईदेववाडी परिसरात पकडलेल्या सात फूट लांबीच्या अजगराबद्दलची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना व ग्रामस्थना दिली सापाला अजगर (, खपवळरप अॅलज्ञ ूिहिप) लांबी ८ फूट वजन १४ किलो आहे या कार्यक्रमाचे आयोजन त्यांनी स्वतः केले होते. सापांचे प्रकार, विषारी साप कसा ओळखावा, साप हाताळायचा कसा या सर्व गोष्टींची माहिती मुलांना देण्यात आली. येथील मुलांना याबाबत माहिती मिळावी, म्हणून या शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे निलेश उदरभरे (पुजारी) पवन कान्हेरे, चेतन कपाटे, शुभम कान्हेरे यांनी सांगितले.

गावांमध्ये साप दिसला की त्याला मारून टाकले जाते. प्रत्यक्षात फार कमी साप विषारी आहेत. मात्र लोक घाबरून सापांना मारतात, त्यामुळे सापांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. प्रत्येक साप विषारी नसतो. विषारी

साप कसा ओळखायचा, सापांचे प्रकार, सर्पांच्या विविध प्रजाती, साप चावल्यावर प्रथोमचार कसे करावे, साप समोर दिसला, तर काय करावे, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सापांना मारू नका, असे आवाहन करतानाच जखमी पक्षी प्राणी दिसल्यास त्यांच्यावर उपचार करून त्यांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक गण व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

नाशिकरोड येथील जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून तीन आरोपी ९१,४००/- रूपयांच्या मुद्देमालासह ताब्यात गुन्हे शाखा, युनिट-२ ची उल्लेखनीय कामगिरी

नाशिक प्रतिनिधी : माजिद खान

मा. पोलीस आयुक्त संदिप कर्णिक सो, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे/विशा, प्रशांत बच्छाव सो, मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे संदिप मिटके सो, यांनी उघडकीस न आलेले गंभीर गुन्हे उघडकीस आणणे बाबत सुचना दिलेल्या आहेत.आज दिनांक ३०/११/२०२४ रोजी नाशिकरोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ६३१/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणेच्या गुन्हयातील आरोपी हे विहीतगाव वालदेवी नदी वरील श्री आण्णा गणपती पुलाजवळ असले बाबत गुन्हे शाखा, युनिट-२, नाशिक शहर कडील सपोनि/डॉ. समाधान हिरे यांना खात्रीशिर गोपनिय बातमी प्राप्त झाली, सदर बातमीची खात्री करणे बाबत श्री. विद्यासागर श्रीमनवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या आदेश व मार्गदर्शनानुसार सपोनि/डॉ. समाधान हिरे, सपोउनि/विलास गांगुर्डे, सपोउनि/शंकर काळे, पोहवा / प्रकाश भालेराव, पोहवा/प्रकाश महाजन, पोहवा/नितीन फुलमाळी, पोअं/संजय पोटींदे व चापोहवा /अतुल पाटील अशांनी सापळा रचुन १) महेश ओमकार पुजारी, वय १९, रा. जेतवन नगर, उपनगर, नाशिकरोड, २) पृथ्वी निलेश भालेराव, वय २० वर्षे, राहणार - देवळाली गाव, राजवाडा, नाशिकरोड, ३) करण रमेश डावर, वय १९ वर्षे, रा. जेतवन

नगर समोर, उपनगर, नाशिकरोड यांना ताब्यात घेतले असता त्यांनी तिघांनी मिळून गुन्हा केल्याबाबत व गुन्हा करतेवेळी त्यांच्या ताब्यात असलेली हिरो पॅशन प्लस मोटार सायकलचा वापर केल्या बाबतची कबुली दिल्याने त्यांचे ताब्यातून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, जबरी चोरी केलेले २ मोबाईल फोन व रोख रक्कम असा ९१,४००/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा उघडकीस आणून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

सदरची कामगीरी वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क्र. २ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विद्यासागर श्रीमनवार, सहा. पोलीस निरीक्षक डॉ. समाधान हिरे, श्रेणी पोउनि / अजय पगारे, श्रेणी पोउनि/मुक्तारखान पठाण, श्रेणी पोउनि / यशवंत बेडकोळी, सपोउनि / विलास गांगुर्डे, सपोउनि/शंकर काळे, पोहवा / प्रकाश भालेराव, पोहवा / प्रकाश महाजन, पोहवा / नितीन फुलमाळी, चापोहवा/अतुल पाटील, पोअं / संजय पोटींदे, सपोउनि/राजेंद्र घुमरे, सपोउनि / गुलाब सोनार, पोहवा/मनोहर शिंदे, पोहवा/संजय सानप, पोहवा / नंदकुमार नांदुर्डीकर, पोहवा /सुनिल आहेर, पोहवा / प्रकाश बोडके, पोहवा / चंद्रकांत गवळी, पोहवा/किरण अहिरराव, पोहवा/मनोज परदेशी, पोहवा/वाल्मीक चव्हाण, चापोअं/जितेंद्र वजीरे अशांनी केलेली आहे.

नवनिर्वाचित खासदाराचे मोगलाजी शिरशेटवार यांच्याकडून जंगी स्वागत

दैनिक झुंजार जनता.. नांदेड जिल्हा प्रतिनिधी मारोती कुडकेवार

नांदेड:- २३ नोव्हेबर रोजी राज्याच्या विधानसभेसोबतच लोकसभेचाही निकाल जाहीर झाला. मागच्या लोकसभेच्या निवडणुकीत माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांचा दणदणीत पराभव करीत कै. वसंतराव चव्हाण निवडून आले होते. मात्र नियतिला

अजून काही वेगळेच मान्य होते म्हणूनच की काय, खासदार वसंतराव चव्हाण स्वर्गवासी झाले. आणि विधानसभे सोबतच लोकसभेचीही पोटनिवडणूक जाहीर झाली. अपेक्षाप्रमाणे प्रा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आणि अखेरच्या श्वासापर्यंत रंगलेला निवडणुकीचा निकाल रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या बाजूने लागला व ते खासदार बनले.

अशोक चव्हाण भाजपवासी होताच संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेसमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली होती. मात्र आपल्या पक्षनिष्ठतेचे सोदाहरण स्पष्ट करीत देगलूर काँग्रेसची धुरा आपल्या खांद्यावर घेत मोगलाजी शिरशेटवार यांनी एकीकडून खिंड लढविली. शिवाय जनतेनेही त्यांना अपार प्रेम दाखविला व शेवटपर्यंत त्यांच्यासोबत राहिल्यानेच प्रा. रवींद्र वसंतराव चव्हाण खासदार बनले. खासदार बनवण्यात मोठा वाटा उचलणाऱ्या मोगलाजी शिरशेटवार यांच्यावर अनेकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. आणि याचेच औचित्य साधत मोगलाजी शिरशेटवार यांनी आपल्या पक्षातील धुरंदरांना सोबत घेऊन नवनिर्वाचित खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांच्या नायगाव येथील संपर्क कार्यालयास भेट देऊन त्यांचा जंगी सत्कार केला. शिवाय खासदाराच्या भेटीला मोठा वाहनांचा ताफा घेऊन गेल्यानेच नायगावची जनता ही अवाक राहिल्याची चर्चा ऐकवात आहे.

****

झुंबर मधून प्रेरणादायी व्यक्तिमत्वांच्या अनेक पैलूंचा उलगडा करण्याचा प्रयत्न - डॉ.कैलास अंभुरे

प्रा. छबुराव भांडवलकरांच्या झुंबर व्यक्तिचित्रण ग्रंथाचा प्रकाशन सोहळा थाटात संपन्न ..

परतूर प्रतिनिधी

व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्ती प्रमाणे वेगवेगळ्या स्वभावाची, विचारसरणीची अनेक माणसे आपल्या आजूबाजूला वावरत असतात, या पैकी काहीजण आपल्या वैशिष्ट्यपूर्ण स्वभावामुळे वेगळेपण निर्माण करतात. अशा व्यक्तीमत्वातून इतरांना प्रेरणा मिळत असते. प्रा. भांवडलकरांनी आपल्या लिखाणातून अशा काही व्यक्तिमत्त्वातील चांगल्या गुणांना आपल्या खास शैलीत शब्दबध्द करण्याचे काम केले आहे. त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे विविध पैलू उलगडविण्याचा प्रयत्न केला असल्याचे मत डॉ. कैलास अंभूरे यांनी व्यक्त केले. प्रा. छबुराव भांडवलकर लिखित झुंबर या व्यक्तिचित्रण ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात झुंबर वार भाष्य करतांना ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ भारत खंदारे तर डॉ. राम रवणेकर, प्रा.बसवराज कोरे, प्रा.रावसाहेब ढवळे,प्रा.यशवंत सोनुने, प्रा.कावेरी खुरणे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना अंभुरे म्हणाले, व्यक्तिचित्रण हा सोपा प्रकार नाही, त्यासाठी लिहिणाऱ्या मध्ये सहभाव असावा लागतो. आत्मकेंद्री माणसांमध्ये सहभाव सहसा आढळून येत नाही. व्यक्तिचित्रण प्रामुख्याने परकेंद्री या प्रकारात मोडते. व्यक्तिचित्रण पुढच्या पिढीला दिशा देण्याचे काम करत असते, पुढच्या पिढीसाठी तरी

आपण लिहिते झाले पाहिजे. डॉ. राम रवनेकर यांनी आपल्या सविस्तर विवेचानातून झुंबर मध्ये उल्लेखित प्रत्येक व्यक्तीचरित्राचा, त्यांच्यातील गुणांचा अध्यात्मिक दृष्टीकोनातून चिकित्सक पद्धतीने मांडलेला अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला. डॉ.रवनेकर यांच्याहस्ते इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झुंबरचे प्रकाशन करण्यात आले. प्रा.भांडवलकर यांनी निवृत्तीनंतरच्या काळात लिखाणात घेतलेली आघाडी इतरांसाठी निश्चित प्रेरणादायी आहे. निवृत्तीनंतरचा वेळ कसा घालवायचा या चिंतेत असणाऱ्यासाठी प्रा.भांडवलकर एक आदर्श ठरू शकतात असे मत आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ भानुदास कदम यांनी तर सूत्रसंचालन डॉ.शरद बोराडे यांनी केले. आभार प्रदर्शन कल्याण बागल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आविष्कार साहित्य मंडळाचे पदाधिकारी आणि साहित्यप्रेमींनी परिश्रम घेतले.

महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळ शपथविधी हा आंबेडकरी अनुयायांचा अवमान ठरेल - अर्जुन पाडेवार

परतूर - ६ डिसेंबर हा महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे. डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातून आंबेडकर अनुयायी मुंबईतील दादर चैत्यभुमीत येत असतात. संपूर्ण आंबेडकरी जनतेसाठी हे दोन दिवस अत्यंत दुःखदायक असतात.मात्र ५ डिसेंबर रोजी राज्यमंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला शपथविधी सोहळा घेऊन जल्लोष करणे हा संपूर्ण आंबेडकरी अनुयायांचा अवमान ठरेल त्यामुळे महापरिनिर्वाण दिनाच्या पुर्वसंध्येला मंत्रिमंडळाचा शपथविधी न घेता तो अन्य दिवशी घ्यावा अशा भावना आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी व्यक्त केल्या आहेत. भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ५ डिसेंबर १९५६ च्या मध्यरात्री अखेरचा श्वास घेतला आणि संपूर्ण देश शोकसागरात बुडाला.६ डिसेंबरची सकाळ बाबासाहेबांच्या निधनाची वार्ता घेऊनच उजाडली आणि भारतासह जगभरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबई येथील शिवाजी पार्कजवळील चैत्यभूमी दादर येथे त्यांच्या अंत्यदर्शनासाठी दाखल झाले. ही परंपरा आजही कायम आहे. दरवर्षी दिनांक १ डिसेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत आंबेडकर अनुयायी येथे दाखल होत असतात. ५ डिसेंबर रोजी भाजप व महायुतीने आझाद मैदानावर नवनिर्वाचित मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा आयोजित केला आहे.५ डिसेंबर ही तारीख निवडणे अमानवीय कृत्य ठरेल.संपूर्ण देश ५ व ६ डिसेंबर रोजी दुःखात असतो याची जाणीव नसणाऱ्या महायुतीचा जाहीर निषेध. ६ डिसेंबर हा दिवस म्हणजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा स्मृतिदिन होय. १९५६ साली यांच दिवशी दिल्ली येथील राहत्या घरी त्यांचे निर्वाण झाले, मंत्री पदाची शपथ घेऊन संपुर्ण महाराष्ट्रभर हे फटाके फोडून जल्लोष साजरा करतील कितपत योग्य वाटते हे समजण्यायोग्य आहे का? अशा भावना आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी व्यक्त केल्या आहेत.

थोर चक्रवर्ती सम्राट यशवंतराव होळकर...

परतूर प्रतिनिधी ....

चक्रवर्ती महाराजा यशवंतराव होळकर हे होळकर साम्राज्याचे महाराजा होते. तसेच ते सम्राट (प्रथम) होते. महाराज यशवंतराव होळकर यांचा जन्म ३ डिसेंबर १७७६ वाफगाव, ता. खेड, जि. पुणे येथे झाला. ते होळकर साम्राज्याचे कर्तृत्ववान महाराजा होते.

मध्य प्रदेश येथील महेश्वर येथे ६ जानेवारी १८०५ साली राज्याभिषेक करून त्यांनी होळकर मराठा साम्राज्याची स्थापना केली आणि ते पाहिले चक्रवर्ती महाराजा झाले. महाराजा यशवंतराव होळकर यांना राजराजेश्वर, महाराजधिराज, चक्रवर्ती ह्या पदव्या दिल्या गेल्या, चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांच्या वडिलांचे नाव सुभेदार तुकोजीराव होळकर (प्रथम) हे होते. तसेच त्यांच्या आई चे नाव यमुनाबाई होळकर होते. लाडाबाई, कृष्णाबाई, तुलसाबाई या चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांच्या पत्नी होत्या. तसेच काशीराव, मल्हारराव, विठोजीराव हे त्यांचे थोरले बंधू होते. चक्रवर्ती यशवंतराव होळकर हे एक कर्तृत्ववान योद्धा होते. त्यांच्या पराक्रमाची चुणूक १७९५ रोजी झालेल्या युद्धात दिसली. या युद्धात चक्रवर्ती यशवंतराव होळकर हे आपले पिता तुकोजीराव यांच्या सोबत दहा हजार सैन्यासोबत सामील झाले होते. त्या वेळी ते अवघे १९ वर्षाचे होते. या युद्धात त्यांनी निजामचा पराभव केला. त्यानंतर चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी इंग्रजां विरुद्धा १८ युद्ध जिंकली त्यांनी आपल्या कर्तुत्वाने जागतिक इतिहास रचला. इंग्रजां विरुद्ध एक ही युद्धात अपयशी झाले नाही. म्हणून त्यांना महाराजा ही पदवी देण्यात आली. त्यामुळे इंग्रज इतिहासकार मालकम हा होळकरांचा कट्टर शत्रु होता. भारतवर्षात आपली हुकूमशाही चालवणाऱ्या इंग्रज सैन्याचा नकाशा चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनीच उतरवला होता. शेवट पर्यन्त इंग्रजांची फ़ौज न



स्वीकरणारे एकमेव चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांना इंग्रज शत्रु मानायचे. तसेच, मराठेशाहीच्या अती विपन्नावस्थेच्या काळात चक्रवर्ती यशवंतराव होळकर हे एक फार तेजस्वी राजा होते. चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांचे मन खुप उदार होते तसेच ते गरिबांचे वालीच होते. ते आपल्या हाता खालच्या मंडळींना स्वतःच्या जीवापलीकडे जपत असायचे. त्यांनी कधीच स्वतःच्या सुखाचा विचार केला नाही. त्यामुळेच चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांचे चरित्र खुप मोठे आहे. १७९८ मध्ये चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी शेविलिअर दुद्रेसाच्या सैन्याचा पराभव केला व मध्य प्रदेश येथील खरगोन जिल्ह्यातील महेश्वर हे आपल्या ताब्यात घेतले. त्यांचा हिन्दू वैदिक पद्धतीनुसार राज्याभिषेक झाला. त्यानंतर ४ जुलै १८०१ रोजी चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी सिंधिया यांची राजधानी उज्जैनवर हल्ला चढवला तसेच जॉन हेसिंगच्या सोबत सिंधियाच्या सैन्याचा पराभव केला. हे सिंधियासाठी अतिशय लाजिरवाणा पराभव होता. त्यानंतर चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी मे १८०२ मध्ये पुण्याकडे कूच केली. २५ ऑक्टोबर १८०२ मध्ये चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी पुण्यातील हड़पसर येथे सिंधिया आणि पेशवे यांच्या संयुक्त सैन्यांचा पराभव केला. हे युद्ध घोरपडी, बनवड़ी, हड़पसर येथे झाले. युद्ध जिंकताच चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी आपल्या सैन्याला आदेश दिले की पुण्यातील नागरिकांचे नुकसान करायचे नाही. पेशव्यांच्या उड्डाणामुळे चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी मराठा राज्याचे सरकार हाती घेतले. चक्रवर्ती यशवंतराव होळकर हे खुप शूर, हुशार, कर्तृत्ववान, धाडसी आणि महत्वकांक्षी होते. चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी इंग्रजां विरुद्ध एकत्रित होवून लढण्यासाठी वेगवेगळ्या राजांना पत्र लिहली की, तुम्हीही सर्वांनी माझ्या प्रमाणे इंग्रजां विरुद्ध लढायला हवे. चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांचे म्हणणे इतर राजांनी दुर्लक्षित केले. कारण त्या सर्व राजांचा करार इंग्रजांसोबत झाला होता. म्हणूनच नंतर चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी स्वबळावर इंग्रजां विरुद्ध लढायचा निर्णय घेतला. त्यानंतर ८ जुलै १८०४ रोजी कोटा व मुकुंद्रे येथील कर्नल ल्यूकान आणि मॅनसन यांच्या सैन्याचा पराभव केला. चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांनी आपल्या तेजस्वी कर्तुत्वाने अनेक युद्धे जिंकली. असे या थोर, तेजस्वी, बलाढ्य कर्तृत्ववान चक्रवर्ती महाराज यशवंतराव होळकर हे २८ ऑक्टोबर १८११ रोजी भानपुर मध्य प्रदेश येथे अनंतात विलीन झाले. चक्रवर्ती यशवंतराव होळकर यांची देशभक्ति खुप थोर होती. आजही इतिहास त्यांच्या तेजस्वी कर्तृत्वाचा साक्षीदार आहे. अश्या थोर सम्राटाला विनम्र अभिवादन ...

दैनिक
झुंजार जनता

३ मंगळवार दि.०३/१२/२०२४

शिरपूरमधील शिव महापुराण कथेसाठी धावल्या १०० बसेस

अमळनेर, जळगावातून सुटल्या बसेस

जळगाव : धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे रविवारपासून पंडित मिश्रा यांच्या शिव महापूराण कथेला सुरुवात झाली असून या कथेला जाण्यासाठी जळगाव जिल्ह्यातूनदेखील भाविक मोठ्या संख्येने जात आहे. जळगाव, अमळनेर, बसस्थानकातून दिवसभरातून सुमारे १०० बस या शिरपूरला गेल्याची माहिती एसटी विभागाकडून मिळाली आहे. जळगाव एसटी विभागाकडून शिरपूर येथे होणाऱ्या शिवमहापुराण कथेसाठी विशेष बसचे नियोजन केले आहे. जळगाव व अमळनेर आगारातून बस सोडल्या जात असून या बसस्थानकावरून कथेला जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असून आहे. रविवार, दि. १ रोजी दिवसभरात १०० एसटी बस शिरपूर येथे कथास्थळी गेल्या, तसेच अन्य दिवशी भाविकांच्या गर्दीनुसार जळगाव एसटी विभाग बस शिरपूर येथे सोडल्या जातील, अशी माहिती जळगाव एसटी विभागाचे विभागीय वाहतूक अधिकारी दिलीप बंजारा यांनी 'बोलताना दिली.

जळगाव बसस्थानकावरून गर्दी

कथा ऐकण्यासाठी जळगाव येथून रविवारी मोठ्या संख्येने भाविक एसटी बसने गेले. जळगाव बसस्थानकावरून सकाळी सुमारे २५ ते ३० बस या शिरपूर येथे जादा सोडण्यात आल्या.

अमळनेर तालुकाजवळ धुळे जिल्ह्यातील शिरपूर हे जळगाव जिल्ह्यातील चोपडा व अमळनेर तालुके जवळ आहेत. त्यामुळे या तालुक्यातील भाविकांची मोठी संख्या आहे. बसस्थानकावरून रविवारी सुमारे ३० ते ३५ एसटी बस तर अमळनेर येथून सुमारे ३० बस भाविकांसाठी सोडण्यात आल्या.

==========

ऑनलाइन पेमेंटमुळे एटीएमवरील गर्दी रोडावली

अकोला : अलीकडच्या चार ते पाच वर्षात प्रत्येकाच्याच हातात अँड्रॉइड मोबाइल आला असून, आर्थिक देवाण-घेवाणसाठी विविध स्वरूपातील 'पेमेंट ॲप्स'चा त्यात समावेश करण्यात आलेला आहे. यामुळे डिजिटल व्यवहारास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. ऑनालाइन पेमेंटला प्राधान्य दिले जात आहे. त्याचा प्रचंड परिणाम होऊन बँक आणि एटीएमवरील गर्दी रोडावल्याचे दिसून येत आहे.

==========

आखतवाड्यात गुड मॉर्निंग पथक धडकले

अकोला : उघड्यावर शौचास जाणाऱ्यांना आळा बसावा, या उद्देशाने रविवारी अकोला तालुक्यातील आखतवाडा येथे पंचायत समितीच्या वतीने गुड मॉर्निंग पथकाची मोहीम राबविण्यात आली. गावकऱ्यांचे मागणीनुसार, १ डिसेंबर रोजी पहाटे पाच वाजता गावात पथक धडकल्याने उघड्यावर शौचाला जाणाऱ्यांची गोची झाली.मागील काही दिवसांपासून गावातील अनेकांच्या घरी शौचालय असताना काही व्यक्ती जाणीवपूर्वक उघड्यावर शौचाला जात असल्याची माहिती मिळाल्याने पंचायत समितीच्या पंचायत विभागाने ही मोहीम राबविली आहे. यावेळी उघड्यावर शौचाला जाणाऱ्यांना जाब विचारून त्यांना समज देण्यात आली. या मोहिमेत गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांच्या मार्गदर्शनात विस्तार अधिकारी पंचायत सतीश सरोदे, आखतवडाचे ग्रामपंचायत अधिकारी संजय श्रीवास, आर. पी. थोरात, दिलीप पाटकर, गणेश गवळी, बीआरसी संतोष चतरकर, ग्रामपंचायत कर्मचारी बाळू रायबोले, पाणीपुरवठा कर्मचारी मनोज चिपळे, रोजगार सेवक नामदेव तालोट व गावातील स्वयंसेवकांनी या पथकामध्ये सहभाग घेतला.

==========

नोंदणीधारक शेतकऱ्यांना कोणत्याही केंद्रावर सोयाबीन विकण्याची मुभा द्या!'

व्याळा : हमीभाव केंद्रांवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना कोणत्याही केंद्रांवर सोयाबीन विकण्याची मुभा द्यावी, अशी मागणी व्याळा येथील शेतकऱ्यांकडून होत आहे.शासनाने हमीभावाने नाफेड खरेदी केंद्र सुरू केली; मात्र सुरुवातीला अत्यल्प केंद्र असल्याने शेतकऱ्यांनी मिळेल तिथे नोंदणी केली. आता बरेच केंद्र सुरू झाले असून, अशा केंद्रांवर त्या परिसरातील शेतकऱ्यांची दुबार नोंदणी होत नसल्याने ज्या केंद्रांवर नोंदणी केली आहे, तेथेच शेतकऱ्यांना सोयाबीन विकावे लागणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांना कमालीचा त्रास होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन शेतकऱ्यांना कोणत्याही केंद्रांवर सोयाबीन विकण्याची मुभा द्यावी, अशी मागणी व्याळा येथील शेतकऱ्यांकडून होत आहे.

'एमपीएससी' परीक्षेला १४२५ उमेदवार गैरहजर!

२६०३ उमेदवारांनी दिली परीक्षा

कोला: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा रविवार, १ डिसेंबर रोजी घेण्यात आली. अकोला शहरातील १३ उपकेंद्रांवर २ हजार ६०३ उमेदवारांनी ही परीक्षा दिली असून, १ हजार ४२५ उमेदवार 'एमपीएससी'च्या परीक्षेला गैरहजर राहिले. सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते ५ अशा दोन सत्रात 'एमपीएससी'ची परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी अकोला शहरातील १३ उपकेंद्रांवर एकूण ४ हजार २८ उमेदवार प्रविष्ट होते. त्यापैकी सकाळच्या सत्रात २ हजार ६०३ उमेदवारांनी परीक्षा दिली असून, उर्वरित १ हजार ४२५ उमेदवार परिक्षेला गैरहजर होते. तसेच दुपारच्या सत्रात २ हजार ५९२ उमेदवार परिक्षेला हजर होते तर उर्वरित १ हजार ४३६ उमेदवार परीक्षेला गैरहजर होते. विशेष निरीक्षक म्हणून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांनी शहरातील काही परीक्षा केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली.'एमपीएससी' परीक्षेच्या पार्श्वभूमीवर शहरातील परीक्षा केंद्र व परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी केंद्राच्या आतील व बाहेरील १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले होते. तसेच परीक्षा केंद्रांच्या परिसरात पोलीस बंदोबस्ता तैनात करण्यात आला होता. परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातीला झेरॉक्स सेंटर, पानपट्टी, लॅपटॉप टायपिंग सेंटर, ध्वनिक्षेपक आदी परीक्षा संपेपर्यंत बंद ठेवण्यात आले होते.

चिखलीतील विद्यार्थिनीचा सिकंदराबादेत मृत्यू!

परीक्षेसाठी गेली होती सिंकदराबादला !

चिखली : रेल्वे विभागामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचा पेपर देऊन रेल्वेने परत निघालेल्या २० वर्षीय विद्यार्थिनीचा सिकंदराबाद रेल्वे स्टेशनवर अपघाती मृत्यू झाल्याची घटना दि. २९ नोव्हेंबरच्या रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली आहे. वैष्णवी राजू खेडेकर असे मृत पावलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. तालुक्यातील अंत्री खेडेकर येथील रहिवासी राजू तेजराव खेडेकर यांची मुलगी वैष्णवी राजू खेडेकर (२०) ही १३ नोव्हेंबर रोजी सिकंदराबाद येथे रेल्वे विभागाडे घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा देण्यासाठी गेली होती. पेपर संपल्यानंतर घराकडे परतण्यासाठी सिकंदराबाद रेल्वे स्टेशनमध्ये आली असता रात्री ९ वाजताच्या सुमारास रेल्वे अपघातात तिचा मृत्यू झाला. या घटनेने अंत्री खेडेकर गावावर शोककळा पसरली आहे. मृतक वैष्णवी पश्चात वडील राजू खेडेकर, आई मुक्ता खेडेकर व भाऊ ओम खेडेकर असा परिवार आहे.

बांगलादेश मधील साधुसंत तसेच हिंदूंवरील होणाऱ्या अत्याचार चा निषेध

मलकापूर :- बांगलादेश मधील साधुसंत तसेच हिंदूंवरील अत्याचार विरुद्ध तत्काळ उपाययोजना करून हिंदूंवरील अत्याचार थांबविण्या बाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,विश्व हिंदू परिषद व बजरंग दल आणि सकल हिंदू समाजाकडून गृहमंत्री भारत सरकार यांना उपविभागीय अधिकारी मलकापूर यांच्यामार्फत निवेदन दिनांक २ डिसेंबर रोजी देण्यात आले.

सदर निवेदनात नमूद केले आहे की बांगलादेशातील हिंदू, महिला आणि इतर सर्व अल्पसंख्यांकांवर इस्लामिक कट्टर वाद्यांकडून होणारे हल्ले, खून, लूटमार, जाळपोळ तसेच अमानुष अत्याचार अत्यंत चिंताजनक आहेत.या सर्व घटनेचा आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत आहे .

हिंसा थांबविण्या ऐवजी सध्याचे बांगलादेश सरकार आणि इतर यंत्रणा केवळ मूक प्रेक्षक बनून आहेत, बांगलादेशातील हिंदूंनी स्वसंरक्षणासाठी लोकशाही मागणी उठवलेला आवाज दाबून टाकण्यासाठी अन्याय आणि अत्याचाराचा एक नवा टप्पा उदयास येत आहे, अशा शांततापूर्ण निदर्शनामध्ये हिंदूंचे नेतृत्व करणाऱ्या इस्कॉन चे आध्यात्मिक गुरू चिन्मय कृष्ण दास यांना बांगलादेश सरकारने तुरुंगात पाठवणे अन्यायकारक अन्यायकारक आहे. बांगलादेश पोलिसांनी सोमवारी इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा चेतनाचे (इस्कॉन) चिन्मय कृष्ण दास ब्रह्मचारी यांना ढाका येथील हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातून चितगावला जात असताना अटक केली. हे इतपत थांबले नाही तर काल

इस्कॉन मंदिराचे दुसरे पुजारी भिक्षू रामदास प्रभू यांना ही तुरुंगात जिहादी म्हणून डाबले .

हिंसाचार ग्रस्त बांगलादेशातील हिंदू बांधवा

वरील अत्याचार थांबविण्यात येऊन इस्कॉन चे आध्यात्मिक गुरु चिन्मय कृष्ण दास व रामदास प्रभु यांची तुरुंगातून तात्काळ सुटका करण्यात यावी.

तसेच भारत सरकारने हिंदू व इतर अल्पसंख्याकावर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी कठोर व तात्काळ पाऊल उचलावे आणि साधू संत यांच्या समर्थनार्थ त्वरित जागतिक जनमत तयार करण्या साठी आवश्यक ती पावले उचलावी. अशी मागणी आम्ही निवेदनातून करत आहोत. तसेच बांगलादेशमध्ये हिंदूंवरील होत असलेल्या अत्याचाराच्या सर्व घटनेचा आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, सकल हिंदू समाज तीव्र शब्दात निषेध नोंदवत आहे. सदर निवेदनाच्या प्रतीलीपी, मा.राष्ट्रपती महोदया,भारत सरकार दिल्ली,

मा.जिल्हाधिकारी साहेब ,बुलढाणा यांना सुद्धा पाठवण्यात आल्या. या निवेदनावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका संघ चालक ज्ञानदेवराव पाटील, नगर संघ चालक दामोदर लखानी, नगर सह संघ चालक राजेश महाजन, विश्व हिंदू परिषद जिल्हा उपाध्यक्ष श्रीकृष्ण तायडे, बजरंग दल तालुका संयोजक दीपक कपले, विश्व हिंदू परिषद जिल्हा सहमंत्री सुयोग शर्मा, समस्त जिल्हा सहप्रमुख दीपक चवरे, विश्व हिंदू परिषद शहर अध्यक्ष मोहन सिंग राजपूत, शहर उपाध्यक्ष विशाल दवे, डॉ. जयंतराव राजुरकर भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष शंकरराव पाटील, शहर उपाध्यक्ष संतोष बोंबटकार, श्याम भल्ला, निलेश लढा, प्रा. नितीन भोळे प्रवीण जैन, ईश्वर दीक्षित, दिलीप मालपाणी, बनसिदास बैरागी, भारतीय जनता पार्टी जैन प्रकोश चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. योगेश पटणी, भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष एडवोकेट सौ .अर्चना शुक्ला, प्रा. राजेंद्र पांडे. सुनील शुक्ला, डॉ. नितीन भुजबळ, धीरज वैष्णव, रवींद्र जोशी, जितेंद्र आकोटकर, स्वप्निल जैन, यांसह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

माजी उपसरपंचाचा खून करणारा बारा तासात गजाआड

शिक्रापूर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

तळेगाव ढमढेरे, : शिक्रापूर (ता. शिरुर) ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच व शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा सल्लागार दत्तात्रय बंडू गिलबिले यांचा जुन्या वादाच्या कारणातून भरदिवसा धारदार शस्त्राने खून करुन फरार झालेल्या आरोपीला शिक्रापूर पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने पुणे परिसरातून बारा तासात जेरबंद केले असून पप्पू नामदेव गिलबिले असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या आरोपीचे नाव आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच व शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा सल्लागार दत्तात्रय बंडू गिलबिले व पप्पू गिलबिले याची पत्नी दोघांमध्ये मोबाईल वरुन चाटिंग होत असल्याने काही दिवसांपूर्वी वाद झालेले होते, त्यांनतर रविवार १ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास दत्ता गिलबिले घराजवळ बसलेले असताना अचानकपणे आलेल्या पप्पू गिलबिले याने धारदार शस्त्राने दत्तात्रय यांच्या मानेसह अंगावर वार करुन दुचाकीहून पळून गेला, दरम्यान नागरिकांनी दत्तात्रय गिलबिले यांना उपचारासाठी शिक्रापूर येथील खाजगी रुग्णालयात नेले मात्र उपचारापूर्वी दत्तात्रय बंडू गिलबिले (वय ५२ रा. कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांचा मृत्यू झाला, याबाबत रोहिणी दत्तात्रय गिलबिले (वय ४२ रा. कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पप्पू नामदेव गिलबिले (रा. कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला. दरम्यान पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, पोलीस हवालदार विकास पाटील, रोहिदास पारखे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार जनार्दन शेळके, तुषार पंधारे, संजू जाधव यांनी फरार पप्पू चा शोध घेत चाकण तसेच पुणे परिसरात सापळे लावले मात्र पप्पू वारंवार जागा बदलत असल्याने अडचणी येत होत्या मात्र खराडी भागात अचानकपणे सिगारेट घेऊन उभ्या असलेल्या पप्पूला पोलिसांनी ओळखत जेरबंद केले, यावेळी त्याने गुन्ह्याची कबुली देखील दिली असून यापूर्वी झालेल्या वादानंतर दत्तात्रय नेहमी रागाने पाहणे, रस्त्यामध्ये वाहन उभे करणे असे प्रकार करत असल्याने आपण सदर गुन्हा केल्याचे पप्पू गिलबिले याने पोलिसांना सांगितले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय मस्कर हे करत आहे..

शिरदाळेत अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

लोणी धामणी :-आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे येथे रविवार दि.०१ डिसेंबर रोजी अखंड हरीनाम सप्ताहाची सुरुवात झाली आहे. गेली ४७ वर्ष अविरत हे काम चालू आहे. शिरदाळे अखंड हरीनाम सप्ताहाचे यंदाचे ४८ वर्ष असल्याची माहिती शिरदाळे येथील हनुमान भजन मंडाळाने दिली आहे. ०१ डिसेंबर ते ०८ डिसेंबर याकालावधीत श्री हनुमान मंदीरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीमध्ये पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ८ महाप्रसाद ८ ते १० कीर्तन आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती शिरदाळे ग्रामस्थांनी प्रसिद्धी पत्रकाडरे दिली आहे. ह.भ.प.सुनील महाराज झांबरे यांच्या काल्याच्या कीर्तनेनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे पूर्वीपासून अखंड हरीनाम सप्ताहाची परंपरा या गावाला असल्याने परिसरातील भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात. आठ दिवस चालणाऱ्या अखंड हरीनाम सप्ताहात संपूर्ण परिसर हरीनामाच्या जयघोषाने दुमदुमून जातो.

शासन सेवेत गावडेंचे योगदान प्रेरणादायी : पाटोळे

सोमेश्वरनगर - सैन्यदलात २० वर्षे सेवा बजावून सेवानिवृत्तीनंतर शासनाच्या सेवेत आलेल्या रोहिदास गावडे यांचे योगदान प्रेरणादायी असून त्यांच्याकडून कामाप्रती असलेली शिस्त व आरोग्याप्रती असलेली जागृकता विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अंगीकृत करावी. तसेच कामे करताना जिद्द, चिकाटीसह नवनवीन कल्पना स्वीकारताना त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्यावी, असे प्रतिपादन उपसंचालक वर्षा पाटोळे यांनी केले.जिल्हा माहिती कार्यालय येथे उपसंपादक रोहिदास गावडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित निरोप समारंभाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर, माहिती अधिकारी सचिन गाढवे, सहायक संचालक जयंत कर्पे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. श्रीमती पाटोळे म्हणाल्या, रोहिदास गावडे यांनी भारतीय सैन्य दलातील सेवा बजावल्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत माहिती व जनसंपर्क विभागात सन २००८ मध्ये रुजू झाले. त्यांनी अतिशय कमी काळात विभागातील कामकाज जबाबदारीपूर्वक पार पाडले. त्यांच्या अंगी असलेला कामाप्रती जिद्द, बाणेदारपणा, कर्तव्यपारायणता, समयसूचकता आणि आरोग्यविषयी जागृतता वाखाण्याजोगी आहे. सैन्यसेवेतील त्यांची शिस्त कार्यालयीन कामकाजात नेहमी दिसून आली. नवीन क्षेत्रात काम करताना चिकाटीने नव्या क्षेत्राशी त्यांनी जुळवून घेतले, असे सांगून श्रीमती पाटोळे यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. डॉ. ठाकूर म्हणाले, सैन्यदलातून राज्यसेवेत दाखल झालेल्या कर्मचारी आपल्याकरीता प्रेरणादायी असतात. त्यांनी सैन्यदलात देशाप्रती दिलेले योगदान कौतुकास्पद आहे, त्यांचा सन्मान राखला गेला पाहिजे. त्यांना सन्मानाची वागणूक देणे हे आपले कर्तव्य आहे, असेही डॉ. म्हणाले.

सत्कारमुर्ती गावडे म्हणाले, सैन्यदलातील योगदानानंतर पुन्हा देशाची सेवा करता आली हे आपले भाग्य समजतो. विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच पत्रकारांची मोलाची साथ लाभली, यापुढेही देशसेवेकरीता कार्यरत राहीन, असे रगावडे म्हणाले. यावेळी गाढवे,कर्पे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी आपले मनोगत व्यकत केले.

मनोज दोंड यांना गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार

केंदूर (ता. शिरुर) येथील मनोज दोंड यांना सन्मानित करताना पदाधिकारी व मान्यवर. (छायाचित्र आकाश भोरडे)

तळेगाव ढमढेरे,

केंदूर (ता. शिरुर) येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे ग्रंथपाल मनोज दोंड यांना नुकतेच राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार देऊन देऊन सन्मानित करण्यात आले आहे. केंदूर (ता. शिरुर) येथील सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे ग्रंथपाल मनोज दोंड यांनी ग्रंथालय आदर्श करत कोरोना काळात विद्यार्थ्यांना घरी पाठ्यपुस्तक वाटप करणे, ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ दिंडी, वाचन प्रेरणा दिन आदि उपक्रम राबवले असून त्यांच्या कार्याची दखल घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय व अल्पसंख्याक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने नुकतेच जागतिक शांतात शिक्षण विभाग भारतचे सचिव व्हिक्टोरिया मुत्तुम, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांच्या हस्ते राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, याप्रसंगी शिक्षण संचालक महेश पालकर, शिक्षण प्रशासन अधिकारी पी. एस. काळे, प्राचार्य अनिल साकोरे, वैभव गिते, लेखाधिकारी शिवाजी खराडे, संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सत्यजीत जानराव, प्रदेशाध्यक्ष संतोष गायकवाड, आदर्श शिक्षक संजय जोहरे, राजु पानमंद, प्रशांत गांजरे, प्रशांत गलांडे यांसह आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना जागतिक शांतता शिक्षण विभागाच्या कार्यात शिक्षकांची भुमिका बहुमोल असल्याचे मत जागतिक शांतात शिक्षण विभाग भारतचे सचिव व्हिक्टोरिया मुत्तुम यांनी व्यक्त केले.

मसाज सेंटरवर वेश्याव्यवसाय, परदेशातील तरुणीसह तिघी ताब्यात

पुणे :- मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा प्रकार गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक आणि व्यापार प्रतिबंधक विभागाने उघडकीस आणला. या कारवाईत पोलिसांनी परदेशातील तरुणीसह तिघींना ताब्यात घेतले, तसेच मसाज सेंटरच्या व्यवस्थापकासह मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी मसाज सेंटरचा व्यवस्थापक शिव राजेश भोसले (वय २१, रा. एनआयबीएम रस्त, कोंढवा), मालक निखिल राजेंद्र नाईक (वय २६, रा. फुरसुंगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक छाया जाधव यांनी याबाबत कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एनआयबीएम रस्त्यावरील आयरीन स्पामध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक आणि व्यापार प्रतिबंधक विभागाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने बनावट ग्राहक पाठवून शहानिशा केली. तेव्हा मसाज सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून कारवाईकेली. परदेशातील तरुणीसह तिघींना ताब्यत घेण्यात आले. चौकशीत भोसलेने तरुणींना पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याची माहिती उघडकीस आली. तीन तरुणींना ताब्यात घेण्यात आल्यानंतर त्यांची रवानगी सुधारगृहात करण्यात आली. पोलिसांच्या पथकाने मसाज सेंटरमधून मोबाइल संच, तसेच अन्य साहित्य असा ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनखाली ही कारवाई करण्यात आली.

दैनिक
झुंजार जनता
४ मंगळवार दि.०३/१२/२०२४

डाऊच खर्दची शाळा गुणवत्तेत अग्रेसर : संजय गुरसळ

सेवानिवृत्त शिक्षकांकडून शाळेला सीसीटीव्ही भेट

कोपरगाव : जिल्हा परिषदेच्या शाळेत शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे मुले शिक्षण घेताना. त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आमचे नेहमी पाठबळ असते. शाळेतील सर्व शिक्षण आपआपली जबाबदारी चोखपणे पार पडतात. डाऊच खुर्द शाळा दर्जेदार शिक्षणामुळे गुणवत्तेच्या बाबतीत अग्रेसर आहे, असे प्रतिपादन शिवसेना तालुकाप्रमुख, माजी सरपंच संजय गुरसळ यांनी केले.

तालुक्यातील डाऊच खुर्द येथे मुक बधीर विद्यालयायाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांनी स्वखर्चाने ३५ हजार रुपये किमतीचे सीसीटटीव्ही शाळेच्या आवारात बसवून दिले. त्याचे लोकार्पण करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच नेहा गुरसळ होत्या. सेवानिवृत्त मुख्याध्यापक भास्कर गुरसळ, ग्रामसेवक जालिंदर पाडेकर, उपसरपंच अश्विनी पवार, देवा पवार, दिगंबर पवार, संदिप पवार, किरण माळी, मुख्याध्यापक अशोक थोरात, शिक्षिका सविता जमधडे, मनिषा बनसोडे , अंगणवाडी सेविका सविता गुरसळ, दीपाली ठोंबरे आदी उपस्थित होते.

भास्कर गुरसळ यांनी सांगितले की, माझे प्राथमिक शिक्षण याच जिल्हा परिषद शाळेत झाले. जिल्हा परिषद शाळांना खूप अडचणींना सामोरे जावे लागते तरी शिक्षक मेहनत करून विद्यार्थी घडवत असतात. या शाळांमध्ये गरिबांची मुले शिकत असतात. शिक्षक त्यांना आपल्या मुलांसारखे जीव लावून घडवतात. आज शाळेला सीसीटीव्ही

असणे ही गरज झाली होती. त्यामुळे हा खर्च उचलला. आपली शाळा सर्व सुविधायुक्त व निसर्गरम्य आहे असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात सरपंच नेहा गुरसळ यांनी सांगितले की, शाळेला पूर्ण फरशी, ३ टॉयलेट, हायमॅक्स दिवे ग्रामपंचायतीच्य माध्यमातून बसवून दिले आहे. यापुढेही शाळेच्या भौगोलिक विकासात ग्रामपंचायत काम करेल. सूत्रसंचालन मुख्याध्यापक अशोक थोरात यांनी केले तर आभार मनिषा बनसोडे यांनी मानले.

बनसोडे स्कूलने राबवला एक दिवस बाजारचा उपक्रम

बालाजी देडगाव : नेवासा तालुक्यातील माका येथील गुणवत्ता, संस्कार व संस्कृती जपणारी शाळा म्हणून अल्पावधीत लौकिक मिळवलेल्या कै. तात्याबा बनसोडे इंग्लिश मिडीयम स्कूलने एक दिवस बाजाराचा हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवला.सदरची स्कूल नेहमीच विद्यार्थी हिताचे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित असून स्कूलने माका गावातील आठवडी बाजारात जाऊन स्वतः बाजार करण्याचा अनुभव घेतला.

पालकांनीही सदर उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद दिला.या शाळेत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असताना या एक दिवस बाजाराचा या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे व्यवहार कौशल्य विकसित व्हावीत, तसेच विद्यार्थ्यांना नाणी, नोटा यांचे योग्य आकलन व्हावे, वजन माप यांचे ज्ञान यावे, त्यांचे बर्गेनिंग स्किल डेव्हलप व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवला गेला असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सागर बनसोडे यांनी दिली. सदर उपक्रम यशस्वितेसाठी संस्थेच्या संचालिका मीना बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी विशेष परिश्रम घेतले.

शिक्रापुरात किरकोळ वादातून महिलेला मारहाण

तळेगाव ढमढेरे, प्रतिनिधी:
शिक्रापूर (ता. शिरुर) येथील राऊतवाडी फाटा येथे राहणारे राहुल तौर हे घरात असताना त्यांच्या शेजारील अभिजित टेमगिरे व अश्विनी टेमगिरे या दोघांनी राहुलच्या घरासमोर येत आरडाओरडा करुन तुझ्या आईने माझी बदनामी का केली असे म्हणून अभिजित व त्याची पत्नी अश्विनी या दोघांनी राहुलची आई इंदूबाई यांना मारहाण करत दगडावर डोके आपटून जखमी केले, सदर घटनेत इंदुबाई अशोक तौर (वय ४२ वर्षे रा. राऊतवाडी फाटा शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) या जखमी झाल्या असून याबाबत राहुल अंकुश तौर (वय २७ वर्षे रा. राऊतवाडी फाटा शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अभिजित अशोक टेमगिरे व अश्विनी अभिजित टेमगिरे (दोघे रा. राऊतवाडी फाटा शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार राजेश माने हे करत आहे.

शिरुरमध्ये युवकाच्या त्रासामुळे अल्पवयीन मुलीची आत्महत्या

तळेगाव ढमढेरे
शिरुर शहरात शिक्षण घेणारी श्रावणी सांभारे हि अल्पवयीन युवती गोलेगाव येथे तिच्या मामाच्या गावी राहत असून श्रावणी हि महाविद्यालयात जात असताना प्रणव उबाळे हा वारंवार युवतीला भेटून त्याच्याशी बोलण्याबाबत दबाव टाकत होता तसेच युवती भेटण्यास व बोलण्यास नकार देत असल्याने प्रणव याने तू शिक्षण घेत असलेल्या शाळेत तसेच शाळेबाहेर तुझी बदनामी करेल अशी धमकी देखील युवतीला दिली असल्याने युवतीला होणारा त्रास असह्य झाल्याने युवतीने गळफास घेत आत्महत्या केली असून सदर घटनेत श्रावणी संतोष सांभारे (वय १७ वर्षे रा. निमगाव भोगी ता. शिरुर जि. पुणे) या बालिकेचा मृत्यू झाला असून याबाबत संतोष रामदास सांभारे (वय ४५ वर्षे रा. निमगाव भोगी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी प्रणव अशोक उबाळे (रा. ओयासीस कॉलनी, रामलिंग रोड शिरुर ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी झेंडगे करत आहे.

कृषीदूत करणार शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन

नेवासा : शेतीविषयक ज्ञान देण्यासाठी नेवासा तालुक्यातील बहिरवाडी येथे आलेल्या सोनई कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांचे बहिरवाडी येथे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. बहिरवाडी येथे अडीच महिने वास्तव्य करून हे कृषीदूत शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करणार आहेत. या कृषीदूतांचे सरपंच आनंद नांगरे यांनी स्वागत करून कृषीदूतांना सर्व्हेक्षणकामी सहकार्य करण्याची भूमिका घेतली. शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे जीवनमान, सामाजिक, आर्थिक स्तर, साक्षरतेचे प्रमाण, संबंधित गावातील पीक पद्धती, नैसर्गिक संसाधने अशा विविध गोष्टीचा अभ्यास विद्यार्थी करणार असून शेतकऱ्यांना मातीपरीक्षण, पाणीपरीक्षण, विविध पिकांवरील

रोग, किडींची व्यवस्थापन याबद्दल माहिती देणार आहेत.

सोनई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. मोरे, उपप्राचार्य एस. व्ही. बोरुडे, समन्वयक डॉ. ए. ए. दरंदले, प्रा. जे. एम. वाघमारे, प्रा. आर.एस. गोंधळी, प्रा. आर. टी. दिघे तसेच विषय विशेषज्ञ यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना लाभणार आहे. बहिरवाडी येथे झालेल्या कृषीदूतांच्या आगमन प्रसंगी कृषीदूत ओंकार घाडगे, ज्ञानेश हरिश्चंद्रे, सौरभ कल्हापुरे, निखिल तेलोरे, यश राशिनकर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यरत राहणार आहेत. याप्रसंगी सरपंच आनंद नांगरे. उपसरपंच नंदा पंडित, ग्रामसेवक एस. बी. गिरी तसेच ग्रामस्थानी कृषीदूतांचे स्वागत केले.

संतोष नरसेकर यांना पॉवरलिफ्टिंगमध्ये कांस्यपदक

नागपूर : गोहाटी (आसाम) येथे झालेल्या २० व्या अखिल भारतीय बीएसएनएल डब्ल्यूएलपीएल बीपी स्पर्धेत बीएसएनएलचे नागपूर येथील सहाय्यक महाव्यवस्थापक संतोष नरसेकर यांनी पॉवरलिफ्टिंगमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन करीत कास्यपदक जिंकले.

ही स्पर्धा आसाम सर्कल स्पोर्ट अँड कल्चरर बोर्डाच्या विद्यमाने ११ के १३ नोव्हेंबरदरम्यान आयोजित करण्यात आली होती. देशभरातून टेलिकॉम सर्कलमधील ४५ खेळाडूंनी भाग घेतला. नरसेकर यांनी स्पर्धेत पॉवरलिफ्टिंगमध्ये ८३ किलो वजन गटात कांस्यपदक पटकाविले. याआधीही त्यांनी २०१७ मध्ये झालेल्या सतराव्या अखिल भारतीय बीएसएनएल डब्ल्यूएल बी पी स्पर्धेत कास्यपदक प्राप्त केले होते. ते धंतोली भागातील ११० वर्षे जुन्या कहाते गोखले व्यायामशाळेचे खेळाडू आहेत. बीएसएनएल नागपूरचे मुख्य व्यवस्थापक यश पांडेकर, नम्रता तिवारी, व्यवस्थापक नरेंद्र नाकतोडे, उपसंयोजक प्रशांत गणवीर यांनी नरसेकर यांचे अभिनंदन केले.

मंचर येथे दागिन्यांच्या दुकानात चोरी

प्रतिनिधी - निरगुडसर
मंचर ता. आंबेगाव येथील सराफ बाजारातील असलेल्या श्रीराम ज्वेलर्स या दुकानांमध्ये चोरी झाली असून दुकानामध्ये आलेल्या अज्ञात महिलेने दुकानातील ७४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे पेंडल हातचलाखीने चोरून नेले आहे.
मंचर सराफ बाजारात निलेश गोरक्षनाथ कदम यांचे श्रीराम ज्वेलर्स नावाचे दुकान असून दिनांक २९ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजताच्या दरम्यान त्यांच्या दुकानांमध्ये बुरखा परिधान केलेली एक महिला आली होती. त्यावेळी तिने मला सोन्याचे पेंडल खरेदी करायचे आहे असे सांगतीले. त्यावेळी दुकानात असलेल्या श्रद्धा कदम यांनी त्यांना काउंटर मधून पेंडल दाखवण्यासाठी दिले असता सदर महिलेने हातचलाकी करत ७५ हजार रुपये किमतीचे नऊ ग्रॅम शंभर मिली वजनाचे सोन्याचे पेंडल चोरून नेले आहे. याबाबत निलेश कदम यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अनोळखी महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मंचर पोलीस करत आहे.

प्राचार्य अंगद काकडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सन्मान

श्रीरामपूर : प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अंगद काकडे यांचा सेवानिवृत्ती समारंभ नुकताच झाला. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. एस. पी. लवांडे होते. अध्यक्षस्थानी रावसाहेब म्हस्के होते. सुरुवातीला प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविक व स्वागत प्र. पर्यवेक्षक संजय ठाकरे यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते अंगद काकडे व छाया काकडे यांचा शाखेच्यावतीने सन्मान करण्यात आला. काकडे यांनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व शालेय साहित्य भेट दिले. विद्यालयासाठी हार्मो नियम पेटी भेट दिली. याप्रसंगी देवेश आहेर, नरेंद्र ठाकरे, बाळासाहेब ढोमसे, प्रमोद तोरणे, दिलीप ढवळे, विनायक

राऊत, मधुकर पवार, ॲड. रोहिणी शिंदे, प्रा. अनघा काकडे, प्रा. अजिंक्य काकडे, मुख्याध्यापिका छाया काकडे, ए. यु. शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य अंगद काकडे यांनी आपल्या संस्थेतील प्रदीर्घ सेवेत सहकार्य केलेल्या सहकारी शिक्षकांबद्दल आणि रयत शिक्षण संस्थेबद्दल मनापासून ऋणनिर्देश व्यक्त केले. प्राचार्य डॉ. लवांडे व अध्यक्ष रावसाहेब म्हस्के यांनी उभयतांना शुभेच्छा दिल्या.

या समारंभासाठी एकनाथ घोगरे, डॉ. सुनील नरके, अण्णासाहेब मांजरे, दत्तात्रेय सोले, दिलीप ढवळे, सुनील वारे, जितेंद्र शिंदे, अण्णासाहेब साबळे, हरिभाऊ चौधरी, मधुकर जाधव, एकनाथ शिंदे, दिलीप भोसले, अलका आहेर, सुभाष भुसाळ, अक्षय काकडे, प्रमोद काकडे, माजी मुख्याध्यापक त्रिभुवन सर, मुख्याध्यापक रकटे सर, रतिलाल भंडारी, चंदूभाई तांबोळी, सद्गुरु कात्रजकर, मुख्याध्यापक देवराम वडीतके, विष्णू हाडोळे, राहुल चांदगुडे, मुख्याध्यापिका सौ. शिरसाठ, माजी मुख्याध्यापिका सिंधू क्षेत्रे, सतीश पठाडे, सुरेश खंडीझोड, बाबासाहेब अंत्रे आदींसह शिक्षक, नातेवाईक, विद्यार्थी उपस्थित होते. आभार डॉ. शरद दुधाट यांनी मानले. सूत्रसंचालन अश्विनी सोहोनी व रेणुका वरपे यांनी केले.

जय मल्हारच्या गजरात खंडोबा मंदिरात घटस्थापना

छत्रपती संभाजीनगर : देव मार्तंड... देव मल्हारी, तूच कुलदैवत माझा खंडोबा, यळकोट यळकोट जय मल्हारच्या गजरात उत्साहात सातारा येथील खंडोबा मंदिरात घटस्थापना करण्यात आली. घटस्थापनेनंतर आजपासून षड्रात्रोत्सवाला सुरू सुरुवात झाली आहे.

चंपाषष्ठीनिमित्त सातारा येथील खंडोबा मंदिरात यात्रा महोत्सव भरविण्यात येतो. तत्पूर्वी घटस्थापना करून उत्सवाला सुरुवात करण्याची परंपरा आहे. ही परंपरा यंदाही कायम ठेवली. त्यामुळे आज सकाळी खंडोबा मंदिरात पुजारी दिलीप धुमाळ, अध्यक्ष रमेश चोपडे, सचिव साहेबराव पळसकर तसेच विश्वस्त मंडळींच्या उपस्थितीत घटस्थापना करण्यात आली. यावेळी खासकरून चंपाषष्ठीला मुख्यतः भरीत-रोडग्याचा नैवेद्य दाखवून चंपाषष्ठी साजरी करण्याची परंपरा असल्याने वांग्याचे भरीत, कांद्याची पात आणि रोडग्याचा नैवेद्य दाखवून पूजा करण्यात आली.

दर्शनासाठी सकाळपासून रांगा लावलेल्या भाविकांनी भंडाऱ्याची उधळण केली. यळकोट यळकोट जय मल्हारच्याजयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला. ७ ते ९ डिसेंबर दरम्यान यात्रा असते. रविण्यात येणार आहे.मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली.भाविकांना शांततेने दर्शन घेता यावे यासाठी बॅरिगेट्सदेखील लावण्यात आले आहे, अशी माहिती मंदिराचे अध्यक्ष साहेबराव पळसकर यांनी दिली.

बीडकरांनी मला कधीच एकटे पडू दिले नाही : आ.क्षीरसागर

बीड : बीडच्या जनतेने मला कधीही एकटे पडू दिले नाही. सगळे बीडच माझे कुटुंब आहे. जनसमान्यांच्या आशीर्वादानेच मी दुसऱ्यांदा आमदार झालो असून त्यांच्यासाठी पूर्णवेळ उपलब्ध असेल, अशी ग्वाही आ. संदीप क्षीरसागर यांनी दिली. नागरी सत्कार समितीच्यावतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे झालेल्या सत्कार सोहळ्यात आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. निवडणुकीत आपल्याकडे शेकडो प्रवेश झाले. परंतु हे प्रवेश कसल्याही अटी आणि शर्तीविना झाले. विरोधकांनी निवडणूक काळात अक्षरशः पैशांचा बाजार मांडला होता. परंतु बीडच्या जनतेने भूमिकेशी तडजोड न करता एकनिष्ठ राहिल्याने माझी साथ दिली. आता मला माझ्या बीडकरांनी निवडून दिले आहे. मी दुसऱ्यांदा आमदार झालो आहे. परंतु काही लोकांचा प्रश्न आहे, आता आपण सत्तेत नाही. त्यामुळे आपल्याला निधी मिळणार नाही. पण आता या गोष्टीची काळजी करायची गरज नाही. मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा सरकारने अडवून धरलेल्या आहेत. आता या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका होऊन प्रशासकराज जेव्हा हटेल तेव्हा लोकनिहाय निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना देणे अनिवार्य असते. सत्ताधाऱ्यांचा त्यातील एक रूपयाही कमी करता येत नाही. त्यामुळे आता विकास कामे आणि निधी यांची चिंता करण्याची कसलीही गरज नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले.

“...म्हणून बीडकरांनी पुन्हा आमदार केले”

विरोधक पत्रकार परिषद घेऊन विचारत आहेत की, आ. क्षीरसागरांचे त्यांचे व्हीजन काय ते सांगावे. आता हा प्रश्न विचारण्याचा अधिकार केवळ बीडच्या जनतेला आहे. जर त्यांच्याकडे व्हीजन नसते तर बीडकरांनी त्यांना सलग दुसऱ्यांदा निवडून आणून आमदार केले असते का, असा सवाल खा. बजरंग सोनवणेंनी केला. बीडकरांनी दुसऱ्यांदा वाघ विधानसभेत पाठवला आहे. हा खासदार बजरंग सोनवणे कायम तुमच्यासोबत आहे. त्यामुळे काळजी करण्याची गरज नाही.”

जरांगे पाटील म्हणतील तसं असे सांगत मराठा आरक्षणाबाबत आपली स्पष्ट आणि उघड भूमिका असल्याचेही आ. क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. पत्नी नेहा आणि बंधू अर्जून यांनीही निवडणूक काळात साथ दिल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. खा. बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे, माजी आ.उषा दराडे, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते रविंद्र दळवी, राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, परमेश्वर सातपुते, राहुल सोनवणे, उदयसिंह देशमुख, ॲड. बाळासाहेब कोल्हे, डी. बी. बागल, अशोक येडे, मोहम्मद खमरूल, शेख जाकेर ॲड. विवेकानंद सानप, वैजनाथ तांदळे, खुर्शीद आलम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राजेंद्र आव्हाड यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

कोपरगाव : नोकरी स्वीकारली की ती तन-मन-धनाने करावी. प्रत्येक कामामध्ये जर मनुष्याने आनंद शोधला की ते काम खूप सोपे होते. असेच काम राजेंद्र आव्हाड यांनी मागील ३० वर्षात केले असून यामुळेच त्यांनी नोकरी हसत स्वीकारली व सेवापूर्तीदेखील त्यांनी हसतमुखानेच स्वीकारली आहे, असे प्रतिपादन प्राचार्य के एल वाकचौरे यांनी आव्हाड यांच्या सेवापूर्ती सोहळा कार्यक्रमाच्या निमित्ताने केले.

सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूलचे कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र आव्हाड यांनी विद्यालयात ३० वर्ष केलेल्या अविरत सेवेचा गुणगौरव म्हणून त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा झाला. प्राचार्य वाकचौरे, उपप्राचार्या शुभांगी अमृतकर, पर्यवेशिका प्रज्ञा पहाडे, पल्लवी ससाणे, नंथलीन फर्नांडिस, राम थोरे, शाळेचे जनसंपर्क अधिकारी दत्तात्रय सांगळे यांनी आव्हाड यांचा श्रीफळ, शाल व कला शिक्षक मंगेश गायकवाड यांनी रेखाटली फ्रेम देऊन गौरव करण्यात आला. क्रीडा शिक्षक धनंजय देवकर, बी. के. तुरकणे, शुभांगी अमृतकर, दत्तात्रय सांगळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सोनाली निकम व कविता चांदन यांनी केले.

फार्मर्स डेन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थांचे स्केटिंग स्पर्धेत यश

कोळपेवाडी : कोपरगाव तालुक्यातील चासनळी येथील गोदावरी विकास प्रतिष्ठानचे फार्मर्स डेन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्केटिंग स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करून मोठे यश संपादन केले असल्याची माहिती प्राचार्याअर्चना चांदगुडे यांनी दिली. संगमनेर येथील सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात तालुका क्रीडा संकुल येथे स्केटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्केटिंग स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातून जवळपास २०० मुला-मुलींनी सहभाग घेतला होता त्याचबरोबर फार्मर्स डेन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनीदेखील उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता.

फार्मर्स डेन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्केटिंग स्पर्धेमध्ये उत्कृष्ट सादरीकरण करून सुवर्णपदक, रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. या स्केटिंग स्पर्धेमध्ये प्रणवब्राम्हणे (सुवर्णपदक), अर्चिरा चंदणे (सुवर्णपदक), विश्वम वाणी, अदिती पगारे व अनव चांदगुडे य विद्यार्थ्यानी रौप्यपदक प्राप्त केले. करण्याचा मान मिळवला आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष पंडितराव चांदगुडे तसेच प्राचार्या अर्चना बोरावके, संस्थेच्या संचालिकामाधुरी चांदगुडे, संस्थेचे सचिव रविराज चांदगुडे, उपाध्यक्ष युवराज चांदगुडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. क्रीडा शिक्षक सुनील पाले यांनी सहभागी विद्यार्थ्यांना स्केटिंग स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले होते.

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता**, कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**